महाराष्ट्र शासन
उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया
११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया
ईमेलdmmugondia@gmail.com फोन नं ०७१८२ - २३६६२०

# जाहिरात क्र. २

## विविध प्रशिक्षण/कार्यशाळेकरिता सालेकसा तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी किंवा लागलेल्या परिसरात प्रशिक्षणकेंद्र/मंगल कार्यालय/सभागृह भाडेत्वावर घेण्यासाठी दरनिश्चीत करुन १ वर्ष कालावधीकरिता करार करण्यासाठी इच्छुक पुरवठादारांकडून पुरवठादार नोंदणी करिता अर्ज आमंत्रण

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहायाने दिनदयाळ अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी गोंदिया जिल्हयात जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. अभियानांतर्गत विविध प्रशिक्षण/ कार्यशाळेचे आयोजन मोठयाप्रमाणात करण्यात येत आहे. त्याकरिता सभागृह/प्रशिक्षणकेंद्र/मंगलकार्यालय भाडे तत्वावर घेण्यासाठी दर निश्चीतीकरुन एक वर्ष कालावधीसाठी Frame work agreement करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता प्रशिक्षणस्थळ/ मंगल कार्यालय/सभागृह पुरवठादार यांच्याकडून मर्यादित ई-निविदा (Limited e-tender) प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणकक्षात खालील मुळभुत सोयी सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे.

१. कमीतकमी ५० व्यक्तीची निवास व्यवस्था (बेड, गादी,चादर,फॅन, कुलर, डासंपासून सुरक्षेकरिता साहित्यासह)
२.सुसज्जीत प्रशिक्षणकक्ष (माईक, साऊंड सिस्टम, खुर्ची, टेबल, दरी, फॅन, कुलर, व्हाईट बोर्ड, डस्टर, सह)
३. सुरक्षेकरिता Fire Safety उपकरण

सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रशिक्षणस्थळ/ मंगल कार्यालय/ पुरवठादार/सभागृह/संस्था यांच्याकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

1. DSC (Digital Signature Certificate),
2. http://mahatenders.gov.inया संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा.
3. Shop & Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत असावा किंवा प्रतिष्ठान ग्रामपंचायतीचा क्षेत्रात असल्यास ग्रामपंचायती व्दारे प्रशिक्षण स्थळ/सभागृह/ मंगल कार्यालय भाडे तत्वावर देण्याचा व्यवसाय करण्यास परवानगी असल्याचे प्रमाणपत्र असावे.
4. PAN कार्ड असावे.
5. प्रतिष्ठान स्वत: च्या मालकीचे असल्याचे प्रमाण (कर पावती/इतर प्रमाण)

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक प्रशिक्षण स्थळ/ मंगल कार्यालय/सभागृह पुरवठादार यांनी त्यांच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणीकृत केलेला Login Id तसेच क्र. ३ व ५ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ११/१०३९, साकेत पब्लीक शाळेजवळ , गणेश नगर गोंदिया या पत्यावर दिनांक २६/०२/२०१७ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा.सदर अर्ज procurementgondia@gmail.com या ईमेल वर सुध्दा सादर करता येवू शकेल. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक प्रशिक्षणस्थळ/ मंगल कार्यालय/ हॉटेल/सभागृह पुरवठादार यांच्याकडून कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही.

१६.२.१७

जिल्हा अभियान संचालक
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,
गोंदिया